# डॉ. एच.एन. सिन्हा महाविद्यालय, पातूर

## कविता

## धोंडी धोंडी पानी दे... -- रवींद्र महल्ले

(बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

================================

## मांडणी

## डॉ. ममता इंगोले

(प्रमुख, मराठी विभाग)

----------------------------------------

# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

## रवींद्र वासुदेवराव महल्ले
## यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये

*लोकवाङ्ग्याचा गावरान गोडवा
*ग्रामजीवनातील संकेत
*वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा
*सर्व परंपरांचे उत्तम भान
*ग्रामीण  सुखदुःखांची जाण
*कृषिवल संस्कृतीचा अनुभव,
*गेयता, लयबद्धता, छंदबद्धता,
*कृषिनिष्ठ जाणिवा
*वेधक शैली
*पहाडी आवाजात काव्यगायन
*मैफलीचे कवी म्हणून ख्याती

# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

'धोंडी धोंडी पानी दे...' हा काव्यसंग्रह प्रकाशित,
या कवितासंग्रहास
महाराष्ट्र कामगार साहित्य परिषपदेचा
'गदिमा' पुरस्कार

इतर विशेष :

विविध दूरदर्शन वाहिन्यांवरून काव्यगायन प्रसारित,
विविध दैनिके, मासिके, दिवाळी अंकांतून कविता प्रकाशित
अनेक साहित्य संमेलनातून आमंत्रित कवी म्हणून सहभागी.


# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

प्रस्तुत 'धोंडी धोंडी पानी दे...' कवितेमधून...




कवीने...
पेरणीपूर्व मशागत केल्यानंतर
पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या
शेतकऱ्यांच्या मनोवस्थेचे वर्णन करून,
पाऊस यावा व सर्व जगाचे कल्याण व्हावे
यासाठी आर्ततेने 'धोंडी' मागितली आहे.

# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)



*देली नांगराची पाई*
*केली वखरानं वाई*
*काव्या फनटं येचुन*
*केली कायी कायी आई*
*धोंडी पानी दे...*



# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

रोयनी गेल्या निंगुन
मिरूग झाला वसीन
मिरगाचं किटकुल
पुंजू हयदी कुकीनं
धोंडी पानी दे..

मृग नक्षत्राची
चाहूल घेऊन येणारा
इंद्रगोप / मिरग
(मखमली किडा)’



# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

*भरया धरणीची वटी*
*लोवली बियाले माती*
*सालभरयाचा ह्या सट्टा*
*लावली छातीले माती*
*धोंडी पानी दे...*



# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

उदास दिसे तिफन
सरते दोऱ्या गुंडन
बापुयाची गेली वाचा
कसं फुलील सपन
धोंडी पानी दे...



# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)



डोया वरच पाह्यते
सुर्व्या आगच वकते
ढग झाले डोये आता
पानी त्यातून वाह्यते
धोंडी पानी दे...

# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)



ढगराजा तु बरस
सुटू दे मातीले वास
पळू दे सारया जगाच्या
तोंडात सुखाचा घास
धोंडी पानी दे...

# बी.कॉम. भाग ३ (मराठी आवश्यक)

## धन्यवाद

